# शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता प्रवेश नियामक प्रधिकरणाच्या सर्वसाधारण सूचना.

- महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधिल कलम ९(५) अन्वये विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांनी शैक्षणिक वर्षात केलेले प्रवेश प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून मान्य करुन घेणे बंधनकारक असून उक्त अधिनियमातील कलम १६(३) अन्वये प्रवेश प्रक्रिया शुल्क भरणे वरील नमूद महाविद्यालयांना अनिवार्य आहे.
- प्रवेशाबाबतची माहिती व प्रक्रिया शुल्क ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्याबाबत खालील बाबींचे अनुपालन करावे.

➢ नविन संस्थांनी Login ID व Password साठी खालीलप्रमाणे प्रक्रिया करावी.

अ. www.pnsamiti.com या संकेतस्थळावरील Home page वर Contact Us मध्ये संस्थेची संपुर्ण माहिती संस्थेच्या ईमेल आयडीसह भरावी.

ब. संस्थच्या ईमेल आयडीवर Login ID व Password मिळेल.

➢ प्रवेश बंद दिनांकानंतर (अंतिम प्रवेश दिनांक) संस्थांनी त्यांच्या Login ID मार्फत शैक्षणिक वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेल्या प्रपत्रात ऑनलाईन भरणे.

➢ प्रवेश प्रक्रिया शुल्क भरताना एकुण प्रवेश क्षमता, एकुण प्रवेश क्षमतेपैकी सामाईक प्रवेश फेरीसाठी उपलब्ध जागा (Seats Available for CAP Quota), संस्थास्तरावरील/अनिवासी भारतीय कोटयाअंतर्गत उपलब्ध जागा, TFWS प्रवेश, थेट द्वितीय वर्ष प्रवेश, यांची संख्या अचूक भरणे आवश्यक आहे.

➢ Process Fee Statement मध्ये उपलब्ध जागांची माहिती भरतांना Course Name प्रमाणे भरावी.

➢ प्रवेश प्रक्रिया शुल्क हे एकुण प्रवेश क्षमतेवर आधारीत असून त्याची आकारणी खालीलप्रमाणे आहे:-

अ. सामाईक प्रवेश फेरीसाठी उपलब्ध जागा, TFWS प्रवेश, थेट द्वितीय वर्षातील प्रवेशासाठी (उपलब्ध जागा) व अन्य तत्सम प्रवेश कोटा अशा एकुण प्रवेश कोटा संख्येच्या प्रत्येकी रु. १००/- इतकी आहे.

ब. शैक्षणिक संस्थेची एकूण प्रवेश क्षमता २०० हून कमी असली तरी अशा प्रत्येक शैक्षणिक संस्थेकरिता किमान रु. २०,०००/- इतकी आहे.

क. तसेच संस्थास्तरावरील/अनिवासी भारतीय कोटयाअंतर्गत उपलब्ध जागा प्रत्येकी रु. १०००/- इतकी आहे.

- प्रवेश प्रक्रिया शुल्क हे ऑनलाईन पद्धतीनेच भरणा करणे आवश्यक आहे, कोणत्याही परिस्थितीत धनादेश/धनाकर्ष स्विकारला जाणार नाहीत याची संबंधीत महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

- ज्या संस्थांमधील अभ्यासक्रमांचे प्रवेश संपलेले आहेत (अंतिम प्रवेश दिनांकापर्यंत) अशा संस्थांनी प्रवेशाबाबतची माहिती तसेच प्रवेश प्रक्रिया शुल्काचा भरणा कोणत्याही परिस्थितीत दि.३०/११/२०१७ पर्यंत करणे आवश्यक आहे.

- अन्यथा ज्या संस्था दि.३०/११/२०१७ पर्यंत उक्त प्रक्रिया पुर्ण करणार नाहीत अशा संस्थांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

- ज्या संस्थामधील अभ्यासक्रमांचे या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया अद्यापि सुरु आहे, अशा संस्थांनी प्रवेशाबाबतची माहिती व प्रक्रिया शुल्क त्यांच्या अभ्यासक्रमाच्या अंतिम प्रवेश दिनांकानंतर पुढील १५ दिवसात करणे आवश्यक राहिल.

- प्रवेश प्रक्रिया शुल्क भरल्याशिवाय प्रवेशाची माहिती कन्फर्म होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

- ज्या संस्थांनी प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संबंधीत संचालकांकडे तपासणीसाठी सादर केली असेल/करणार असतील, अशा संस्थांनी संचालकांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदरचा अहवाल संस्थांच्या लॉगीन मधून विद्यार्थीनिहाय ऑनलाईन सादर करतील (Update Directors Report) व प्रवेशाबाबतची माहिती कन्फर्म करतील.

- **त्यानंतर संबंधीत संस्था प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव, प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयात विहीत करण्यात आलेल्या प्रपत्रात/वेळेत आवश्यक कागदपत्रांसोबत कोणत्याही परिस्थितीत प्रत्यक्ष सादर करतील (टपालाने/कुरिअरने सादर करण्यात येऊ नये) त्या महाविद्यालयांच्या लॉगीनमध्ये ऑनलाईन पोच देण्यात येईल.**

*****